पिंपरी चिंचवड महानगरपालिका
अ प्रभाग कार्यालय, निगडी - ४४
क्र.अप्र/प्रशा/२/कावि/ २९९ /०९
दिनांक - ७ /१२/२००९

प्रति,
मा. ................................

सदस्य/ सदस्या अ प्रभाग समिती,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
निगडी पुणे - ४११ ०४४

**विषय: पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या अ प्रभाग समितीची सभा शुक्रवार दिनांक ११/१२/ २००९ रोजी आयोजित केलेबाबत.**

महोदय / महोदया,

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या अ प्रभाग समितीची मासीक सभा शुक्रवार दिनांक ११/१२/२००९ रोजी दुपारी १२.०० वाजता अ प्रभाग कार्यालयातील "राजमाता जिजाऊ सभागृह" येथे आयोजित करणेत आली आहे. सोबत सभेची कार्यपत्रिका जोडली आहे. सभेस आपण उपस्थित रहावे हि विनंती.

आपला विश्वासू,

प्रशासन अधिकारी
अ प्रभाग कार्यालय
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
निगडी, पुणे - ४४

सर्व - १) सर्व सबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी
२) कार्यालयीन नोटीस बोर्ड

**पिंपरी चिंचवड महानगरपालिका**

अ प्रभाग समिती

**कार्यपत्रिका क्रमांक ९**

दिनांक - ११/१२/२००९ दुपारी १२.०० वाजता

---

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या अ प्रभाग समितीची माहे डिसेंबर २००९ ची मासीक सभा शुक्रवार दिनांक ११/१२/२००९ रोजी दुपारी १२.०० वाजता अ प्रभाग कार्यालयातील **"राजमाता जिजाऊ सभागृह"** येथे आयोजित करणेत आली आहे. सदर सभेत खालीलप्रमाणे कामकाज होईल.

अ) दिनांक १६/११/२००९ रोजी झालेल्या सभेचा (कार्यपत्रिका क्रमांक ६, ७ व ८ ) सभावृत्तांत कायम करणे.

विषय क्र.१ पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणाच्या नियोजन नियंत्रण कक्षेतून वगळून पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या नियोजन नियंत्रण कक्षेत समाविष्ठ झालेल्या क्षेत्राच्या विकास योजनेबाबत विचार करणे.
(दि. ११/१२/२००९ चे सभेमध्ये घेणेचे निर्णयाप्रमाणे)

विषय क्र. २ अ प्रभागात अतिक्रमण कारवाईकामी ट्रक, क्रेन, जीप भाड्याने पुरविणेकामी येणाऱ्या रक्कम रु. ९,९८,५००/- चे खर्चास प्रशासकिय मान्यता देणेबाबत.
(दि. ११/१२/२००९ चे सभेमध्ये घेणेचे निर्णयाप्रमाणे)

विषय क्र.३ सेक्टर क्रमांक २१, लोकशाहीर आण्णाभाऊ साठे स्मृती हॉल येथे वाचनालय व स्पर्धा परिक्षा केंद्राकरिता फर्निचर व बैठक व्यवस्था करणेकामी येणाऱ्या र.रु. ५,२१,२००/- (अक्षरी र.रु. पाच लाख एकवीस हजार दोनशे फक्त) चे खर्चास प्रशासकीय मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्र.४ वॉर्ड क्र. ४० मधील महात्मा फुलेनगर झोपडपट्टीमध्ये उर्वरित स्थापत्यविषयक कामे करणेकामी येणाऱ्या र.रु. ९,९०,०००/- (अक्षरी र.रु. नऊ लाख नव्वद हजार फक्त) चे खर्चास प्रशासकीय मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्र.५ वॉर्ड क्र. ४१ मधील रामनगर झोपडपट्टीमध्ये उर्वरित स्थापत्यविषयक कामे करणेकामी येणाऱ्या र.रु. ९,८०,०००/- (अक्षरी र.रु. नऊ लाख ऐंशी हजार फक्त) चे खर्चास प्रशासकीय मान्यता देणेबाबत विचार करणे.

सही/-xxx
प्रशासन अधिकारी
अ प्रभाग कार्यालय
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
निगडी, पुणे - ४४

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
अ प्रभाग कार्यालय, निगडी - ४४
क्र.अप्र/प्रशा/२/कावि/ २९५ /०९
दिनांक - ०७ /१२/२००९

टिप : प्रस्तुत कार्यप्रत्रिकेवरील विषयांची विषयपत्रे (डॉकेट्स) अ प्रभाग कार्यालयात वाचणेसाठी ठेवणेत आलेली आहेत.